मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड, औरंगाबाद.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

## स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग

# लेखापरीक्षण अहवाल

# सन २०10 - २011

Int. Audit
20/07/2012

**संकीर्ण संस्था,** महाराष्ट्र वक्फ बोर्ड, औरंगाबाद

**जिल्हा औरंगाबाद,**

प्रेषक :
सहसंचालक / सहायक संचालक
स्थानिक निधी लेखा परीक्षा
औरंगाबाद


शाखा: Int. Audit
आवक क्र. 412
दिनांक: 20 JUL 2022
स्वाक्षरी आ. का.

# महाराष्ट्र वक्फ बोर्ड,औरंगाबाद लेखापरीक्षण अहवाल सन 2010-2011

जा.क्र.स्था-18/ब/ले.प.अ./मरावमंऔ/ 2010-11/1478

--// कार्यालय //--
सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद .
दिनांक : 18.11.2021.

**प्रेषक,**

**सहाय्यक संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**औरंगाबाद.**

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र वक्फ बोर्ड,औरंगाबाद.**

महोदय,

**महाराष्ट्र वक्फ बोर्ड,औरंगाबाद** चे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. आर.बी.तारो, सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद व श्री.के.व्ही.जोशी, श्री.डी.डी.गव्हाड,श्री.एस.एन.देशमुख,श्रीमती एस.आर.चाबुकस्वार, कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांनी दिनांक 09.02.2021 ते दिनांक 16.03.2021 या कालावधीत पूर्ण केले.

श्री. गो.आ. गंडे, लेखा परीक्षा अधिकारी,स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद यांनी दि.09.04.2021 रोजी पुर्नविलोकन केले व श्री डी. बी. पाटील, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद यांनी दिनांक 13.10.2021 रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा केली व अहवालाचे अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी पदावर कार्यरत होते.

| पदाधिकारी / अधिकारी यांचे नाव | पदनाम | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| श्री एस.एस.अली कादरी | मुख्य कार्यकारी अधिकारी | 01.04.2010 | 17.08.2010 |
| श्री.एस.एन.एम.कादरी | मुख्य कार्यकारी अधिकारी | 18.08.2010 | 22.03.2011 |
| श्री.अजीज अहेमद | मुख्य कार्यकारी अधिकारी | 23.03.2010 | 31.03.2011 |

| 1 | संगणकाच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीवर केलेल्या खर्चाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 1 | 76170 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 76170 | 0 | 0 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना संगणक व फ्रॅकींग मशीन यांच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीवर खर्च नोंदविल्याचे दिसून येते. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक अर्धसमास पत्र क्रमांक 10 दिनांक 05.0.3..2021, अर्धसमास पत्र क्रमांक 15 दिनांक 08.03.21अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक 10.03.2021. व आज्ञापत्र क्रमांक 21 दिनांक 10.03.21 अन्वये मागणी करुनही सदर प्रमाणकांशी संबंधीत संचिका ,व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना संगणक व फ्रॅकींग मशीन यांच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीवर खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 488 | 08.04.10 | 13350 | संगणक देखभाल दुरुस्ती |
| 2 | 568 | 05.07.10 | 17250 | संगणक देखभाल दुरुस्ती |
| 4 | 625 | 01.09.10 | 17250 | संगणक देखभाल दुरुस्ती |
| 5 | 759 | 02.03.11 | 17250 | संगणक देखभाल दुरुस्ती |
| | | एकूण | 65100 | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.वरील प्रमाणकांन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या विभागातील संगणकाची देखभाल दुरुस्तीवर रु.65100 एवढा खर्च नोंदविला आहे. सदर विभागात किती संगणक चालु होते याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. सदर पुरवठादाराने किती भेटी दिल्या व किती संगणकाची तपासणी, दुरुस्ती केली याबाबत दस्तऐवजाची मागणी अर्धसमास पत्र क्रमांक अर्धसमास पत्र क्रमांक 10 दिनांक 05.0.3..2021, अर्धसमास पत्र क्रमांक 15 दिनांक 08.03.21अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक 10.03.2021. व आज्ञापत्र क्रमांक 17 दिनांक 10.3.21 अन्वये

| |
|---|
| मागणी करुनही सदर प्रमाणकांशी संबंधीत संचिका, व अनुषंगिक दस्तऐवज/संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे सदरचा खर्च लेखामान्य करता येत नाही. |

| अर्ध ममाम ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 10 | 05 /03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |

| 2 | वसुलीच्या रकमा विलंबाने बँकेत भरणा करणे बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितनांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | | |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना नाशिक, परभणी व मुंबई जिल्हा कार्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता वक्फ मंडळाच्या मालमत्तेचे भाडे, विविध शुल्कांच्या वसुल केलेल्या रोख रकमा वसुली लिपीकांनी विलंबाने बँकेत भरणा केल्याचे दिसून येते. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :- नाशिक

| अ.क्र. | पावत्या वसुली दिनांक | रक्कम | बँकेत भरणा दिनांक | विलंब (दिवसांत) जिल्हा |
|---|---|---|---|---|
| | | | | नाशिक |
| 1 | 16.04.10 | 3520 | 30.04.10 | 14 |
| 2 | 03.05.10 | 4162 | 14.05.10 | 11 |
| 3 | 05.05.10 | 1100 | 14.05.10 | 09 |
| 4 | 16.12.10 | 820 | 30.12.10 | 14 |
| 5 | 07.01.11 | 910 | 28.01.11 | 21 |
| 6 | 19.01.11 | 20 | 28.01.11 | 09 |
| 7 | 8.02.11 | 17386 | 17.02.11 | 09 |
| | | 00 | | परभणी |
| 8 | 25.06.10 | 27000 | 29.06.10 | 04 |
| 9 | 31.03.10 | 3600 | 05.04.10 | 05 |
| 10 | 06.04.10 | 18000 | 17.04.10 | 11 |
| | | | | मुंबई |
| 11 | 18.5.10 | 12990 | 29.5.10 | 11 |
| 12 | 19.5.10 | 11978 | 29.5.10 | 10 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 13 | 01.06.10 | 21669 | 10.06.10 | 09 |
| | 14 | 02.06.10 | 22917 | 10.06.10 | 08 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.वरीलप्रमाणे वेगवेगळया प्रकारे वसुल करण्यात आलेल्या रकमा वसुल झाल्यानंतर 3 दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक असताना सदर रक्कम बँकेत उशीरा भरण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा सादर करावा.

| अर्ध ममास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 01 | 9/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |
|---|---|

| 3 | दर्गा हजरत शहानुरमीया हमवी रहे उस्मानपुरा औरंगाबाद येथील फुल बैठकीच्या लीलावाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 3 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत शहानुरमीया हमवी रहे उस्मानपुरा औरंगाबाद येथील फुल बैठकीच्या सन 2010-2011 या वर्षासाठी निवीदा मागविण्यात आल्या. रु.100 चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा केलेला नाही. नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना ती जोडलेली नाही. प्राप्त निवीदाधारकासोबत वाटाघाटी करणे आवश्यक असताना वाटाघाटी न केल्याने बोर्डाचे नुकसान झाले आहे..

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत शहानुरमीया हमवी रहे उस्मानपुरा औरंगाबाद येथील फुल बैठकीच्या सन 2010-2011 या वर्षासाठी निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब (फुल बैठक) | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | 35000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | 450000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | 1000 |
| 4 | फुल बैठक कालावधी | दिनांक 1.9.2010 ते 31.8.2011 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | दैनिक औरंगाबाद टाईम्स<br>(नस्तीसोबत दैनिक संलग्न नाही) |
| 6 | करारनामा | केला नाही |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि. |
| 8 | निवीदा उघडणे | दि.21.8.2011 |
| 9 | प्राप्त निवीदा | 1.मोहम्मद समी - रु.175000<br>2.शेख - रु.150000<br>3.शेख इम्तीयाज - रु.160000 |
| 10 | निवीदा मंजुरी | मोहम्मद समी यांची निवीदा सर्वात जास्त रकमेची असल्याने मंजुर करण्यात आली |
| 11 | पुरवठा आदेश | जा.क्र.मरावमं/एसएनटी/552/438/2010 दि.21.8.2010 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा | पावती क्र 30172 दि.23.8.2011<br>रु.180000 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.निवीदा सुचनेतील अट क्रमांक 11 अन्वये निवीदा मंजुर झाल्यानंतर गुत्तेदाराकडून रु.100 चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा केलेला नाही.

2. निवीदा सुचनेतील अट क्रमांक 5 ब अन्वये नुसार अर्जदार हा गुत्तेदार/एजन्सी/भागीदार फर्म/सोसायटी /उदयोग व्यवसाय करत असेल तर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना सदर वरील तीनही पुरवठादार अधिकृत नसताना नियमबाहयरीत्या निवीदा प्राप्त करुन मंजुर केल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3. सदर निवीदा सुंचनेतील निवीदेची अंदाजीत रक्कम विभागाने रु.450000 एवढी ठरवलेली असताना वरीलप्रमाणे गुत्तेदाराचे दर कमी आल्याने त्यांचेसोबत वाटाघाटी करणे किंवा फेरनिवीदा बोलविणे आवश्यक

| |
|---|
| असताना बोलीत भाग घेणा-याबरोबर कोणतेही वाटाघाटी न करता मोहम्मद समी यांना रु.180000 मध्ये गुत्ता देण्यात आल्यामुळे रु.270000 एवढया रकमेने गुत्ता कमी गेल्याने मंडळाचे नुकसान झालेले आहे. पुर्तता करुन अनुपालन सादर करावे. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील बळी (जुबाह) करण्यात येणा-या बोकडांच्या कातडीच्या लीलावाबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 4 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

| |
|---|
| महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत शहानुरमीया हमवी रहे उस्मानपुरा औरंगाबाद येथील फुल बैठकीच्या सन 2010-11 या वर्षासाठी निवीदा मागविण्यात आल्या. रु.100 चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा केलेला नाही. नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना ती जोडलेली नाही. रु.1208000 इतक्या रकमेचे नुकसान झाल्याने सदर रक्कम संबंधीत गुत्तेदाराकडून दंडासह वसुल करणे आवश्यक आहे. सदर परिसर साफ ठेवलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र संचिकेम संलग्न केल्याचे दिसून आले नाही. |

| |
|---|
| महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील बळी (जुबाह) करण्यात येणा-या बोकडांच्यां कातडीच्या लीलावामाठी निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. |

| अ.क्र . | बाब (बोकडांच्या कातडीचा लीलाव) | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | 220000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | 2200000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | 1000 |
| 4 | कालावधी | दि.26.10.2010 ते 25.10.2010 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | औरंगाबाद टाइम्स दिनांक 30.09.2010 |
| 6 | करारनामा | केलेला नाही. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि.15.10.10 ते 20.10.10 वेळ 3.00 वाजेपर्यंत |
| 8 | निवीदा उघडणे | दि.20.10.2010 |
| 9 | प्राप्त निवीदा 8 त्यामधुन 4 निविदा अटी व शर्ती पुर्ण करणा-या ठरल्या | 1.नासेर अहेमद - रु.500000<br>2.मुशीन खान - रु.511111<br>3.रिहयान बिल्डर्स - रु.451000<br>4. गुलशन टेंट हाऊस - रु.651999 |
| 10 | निवीदा मंजुरी | गुलशन टेंट हाऊस - रु.651999 |
| 11 | पुरवठा आदेश | जा.क्र.3869 दि20.10.2010 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा केल्याचा तपशिल | रु.651999 |

प्रथम निविदा दिनांक 30.09.10 रोजीच्या लोकमत टाइम्स मध्ये प्रसिध्द करुन दिनांक 13.10.10 रोजी प्राप्त तीन निविदेच्या अ लिफाफा उघडण्यात आला असुन त्यामध्ये कमी कागदपत्र असल्यामुळे फेर निविदा वर्तमान पत्रात जाहीरात देवुन मागविण्यात आल्याचे नोटशिट वरुन दिसुन येते. फेर निविदा जाहीर प्रगटन औरंगाबाद लोकमत टाईम्म मध्ये दिनांक 14.10.10 रोजी जाहीर प्रगटन देवुन दिनांक 20.10.10 रोजी 3.00 वाजेपर्य निविदा भरण्यात येवुन 8 निविदा प्राप्त झाल्या आहे. दिनांक 20.10.10 रोजी 5.00 वाजता एकुण 8 निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी 4 निविदा अटी व शर्तीची पुर्तता करणा-या ठरल्या असुन त्यापैकी सर्वात जास्त रक्कम रु.651999/- गुलशन टेन्ट हाउस यांची निविदा असल्याने त्यानां निविदा मंजुर केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1. सदर निवीदा सुंचनेतील निवीदेची अंदाजीत रक्कम विभागाने रु.2200000 एवढी ठरवलेली असताना वरीलप्रमाणे गुत्तेदाराचे दर कमी आल्याने त्यांचेसोबत वाटाघाटी करणे किंवा फेरनिवीदा बोलविणे आवश्यक असताना बोलीत भाग घेणा-याबरोबर कोणतेही वाटाघाटी न करता गुलश टेन्ट हाउस यांना रु.651999 मध्ये गुत्ता देण्यात आल्यामुळे रु.1548001 एवढया रकमेने गुत्ता कमी गेल्याने मंडळाचे नुकसान झालेले आहे . पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

2.निवीदा सुचनेतील अट क्रमांक 11 अन्वये निवीदा मंजुर झाल्यानंतर गुत्तेदाराकडून रु.100 चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना असा करारनामा केलेला नाही.

3. निवीदा सुचनेतील अट क्रमांक 5 ब अन्वये नुसार अर्जदार हा गुत्तेदार/एजन्सी/भागीदार फर्म/सोसायटी /उदयोग व्यवसाय करत असेल तर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना सदर वरील पुरवठादार अधिकृत नसताना नियमबाहयरीत्या निवीदा प्राप्त करुन मंजुर केल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4. निवीदा सुचनेमधील अट क्रमांक 20 प्रमाणे दर्गा परिसर नेहमी साफ ठेवणे आवश्यक आहे. इतर लोकांना कोणताही त्रास होणार नाही याची दखल घ्यावी. सदर परिसर साफ ठेवलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र संचिकेस संलग्न केल्याचे दिसून आले नाही.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील परीसरात बोकुड कपातीचे (खांडखुंड) कामाचे लीलावाबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 3 | 211112 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | | 211112 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील परीसरात बोकुड कपातीचे (खांडखुंड) कामाचे लीलावाबाबत सन 2010-2011 या वर्षासाठी निवीदा मागविण्यात आल्या. रु.255787 इतक्या रकमेचे नुकसान झाल्याने सदर रक्कम संबंधीत गुत्तेदाराकडून दंडासह वसुल करणे आवश्यक आहे. सदर परिसर साफ ठेवलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र संचिकेस संलग्न केल्याचे दिसून आले नाही. मंडळाने सदर गुत्तेदार हा मंजुर दरापेक्षा जादा दराने कटींग करीत असल्याबाबतचे कुठलीही चौकशी केल्याचे दिसून आले नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील परीसरात बोकुड कपातीचे (खांडखुंड) कामासाठी निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | रु.50000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | रु.250000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | रु.1000 |
| 4 | कालावधी | दि.1.8.2010 ते 31.7.2011 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | दैनिक औरंगाबाद टाईम्स दि.5.7.2011 |
| 6 | करारनामा | रु.100 चे मद्रांकावर केला आहे. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि.13.7.2010 ते 23.7.2010 |
| 8 | निवीदा उघडणे | दि.23.7.2010- दिनांक 26.10.10 |
| 9 | प्राप्त निवीदा | 1.प्राप्त निविदा संख्या 20 |
| 10 | निवीदा मंजुरी - प्रथम | जनाब निसार अली रु.1100000 |
| 11 | निविदा मंजुरी व्दितीय बोली | पदमा कन्स्ट्रक्शन रु.888888 |
| 12 | पुरवठा आदेश | जा.क्र.संचिका क्र.एसएनटी/141/2010क्र.मरावमं/एमएनटी/4068/2010 दि.26.7.2010 |
| 13 | फेर पुरवठा आदेश | मुख्यकार्यकारी अधिकारी 4196दिनांक 03.08.10 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा केल्याचा तपशिल | 1.पावती क्र. दि.22.7.2011 रु.100000<br>2.पावती क्र.38299 दि.22.7.2011 रु.355000<br>----------------------------------------------<br>एकूण रक्कम = रु.455000 |

सन 2010-11 या वित्तीय वर्षात दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील परीसरात बोकुड

कपातीचे (खांडखुंड) कामाचे जाहीर निविदा प्रगटन लोकमत औरंगाबाद टाईम्स मध्ये दिनांक 15.07.10 रोजी देण्यात आल्याचे दिसुन येते तसेच 20 निविदा टेडर प्राप्त झाले असुन त्यामधुन सर्वात जास्त किंमीचे निविदा जनाब निसार अली प्रीन्स कन्स्ट्रक्शन यांनी 1100000/- घेतल्याचे दिसुन येते. तसेच त्यांना आदेश 4068 दिनांक 26/07/2010 रोजी दिले आहे. तसेच 3 दिवसात 50% रक्कम भरुन देण्याविषयी निविदेच्या अटी व शर्ती नुसार त्यांनी रक्कम भरणा केला नाही. दिनांक 26.07.2010 रोजी निविदा उघडल्या असुन त्याची सर्वात जास्त ऑफर रु.1100000/- असल्याने त्यांना प्रत्यक्ष बोलावुन टेंडर अंतिम करणे योग्य साहिल असे टिप्पणी दिनांक 26.7.10 मध्ये म्हटले आहे.

जनाब निसार अली प्रिन्स कन्स्ट्रक्शन यांनी ठेका घेण्याविषयी असमर्थता दाखवल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांना इसारा रक्कम रु.50000 जप्त करुन दुस-या क्रमांकाच्या निविदेदारास सदर टेंडर देण्याविषयी पत्र देवुन त्यांना कळविल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन येते,पदमा कन्स्ट्रक्शन यांनी दोन नंबर ची बोली रु.888888/- इतकी लावलेली असल्याचे दिसुन येते त्यांना पुरवठा आदेश दिलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1. निसार अली प्रीन्स कन्स्ट्रक्शन यांना रु.1100000/- ठेका देण्यात आला होता. मात्र त्यांनी पैसे भरण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे त्याचे ईएमडी रु.50000/- दंड देवुन दुस-या नंबर च्या टेंडर धारक पदमाजा कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले. प्रीन्स कन्स्ट्रक्शन यांनी रु.1100000 व पदमाजा कन्स्ट्रक्शन यांनी रु.888888/- म्हणजेच दोन्हीतील तफावत रु.211112/- इतक्या रक्कमेचे बोर्डाचे नुकसान झाले आहे. फेर निविदा मागविणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही. निविदा प्रक्रीया नियमानुसार झाली नसल्याचे सदर अभिलेख्यावरुन दिसुन येते.

2. निसार अली प्रीन्स कन्स्ट्रक्शन यांनी ईमडी रु.50000/- व अनामत रक्कम रु.220000/- जमा केले होते त्यांनी ठेका नाकारल्यामुळे फकत रु.50000/- चा दंड दिला. रु.220000/- अनामत जप्त करावयाची होती ती न करता परत दिली आहे. पुरवठा आदेशाप्रमाणे मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम करारनामा करुन देतेवेळेस मंडळाकडे भरली नाही तर निवीदा रदद करण्यात येईल व गुत्तेदाराने भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल असे असताना सदर पुरवठादाराने सदर रक्कमा जप्त करावयास हव्या होत्या त्या न केल्याने बोर्डाचे रु.211112/- चे नुकसान झाले आहे.

3. पदमा कन्स्ट्रकशन यांना कामाचे आदेश जा.क्र.संचिका क्र.एसएनटी/141/2010 क्र.मरावमं/एसएनटी/4196/2010 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.05.8.2010 अन्वये देण्यात आले असून सदरील निवीदेची एकूण रक्कम खालीलप्रमाणे तीन हप्त्यात मंडळाकडे भरणा करावी -

1.रु.400000 - करारनामा करुन देतेवेळेस

2.रु.250000 - 1 नोव्हेंबर 2010 पर्यंत

3.रु.238888 - 2 फेब्रुवारी 2011 पर्यंत

पुरवठा आदेशाप्रमाणे मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम करारनामा करुन देतेवेळेस मंडळाकडे भरली नाही तर निवीदा रदद करण्यात येईल व गुत्तेदाराने भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल असे असताना सदर पुरवठादाराने 450000/- रक्कम दिनांक 10.08.10 रोजी भरल्याबाबत पावतीवरुन दिसून येते. 5 दिवस विलंबाने भरल्याचे दिसुन

येते. दुसरा टप्पा क्र.02 दिनांक 1.11.10 रोजी भरणा करावयाचा असतांना दिनांक 11.11.10 रोजी रु.250000/- भरणा केल्याचे पावतीवरुन दिसुन येते म्हणजेच 11 दिवस विलंबाने भरल्याचे दिसुन येते. तिसरी व अंतीम रक्कम दिनांक 2.02.11 रोजी भरणा करावयाचा असतांना दिनांक 14.02.11 रोजी रु.188888/- भरणा करण्यात आल्याचे पावतीवरुन दिसन येते. विलंब कालावधीसाठी रु.1000/- प्रती दिन दंड लावण्यात आला नाही. निविदेच्या अटी व शर्ती प्रमाणे. याबाबत अनुपालन दर्शवावे.

4. निवीदा सुचनेमधील अट क्रमांक 28 प्रमाणे दर्गा परिसर नेहमी साफ ठेवणे आवश्यक आहे. इतर लोकांना कोणताही त्रास होणार नाही याची दखल घ्यावी. सदर परिसर साफ ठेवलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र संचिकेस संलग्न केल्याचे दिसून आले नाही.

5. निवीदा सुचनेमधील अट क्रमांक 23 प्रमाणे मंडळाने जुबाह् कटींगचे दर खालीलप्रमाणे ठेवलेले आहेत -

| अ.क्र. | बोकडाचे प्रकार | कटींगचे दर |
|---|---|---|
| 1 | मोठे बोकड | रु.175 |
| 2 | मध्यम आकाराचे बोकड | रु.150 |
| 3 | छोटया आकाराचे बोकड | रु.125 |

उपरोक्त दरानुसारच गुत्तेदाराने बोकड जुबाह् करणे आवश्यक आहे, जर गुत्तेदाराने जादा दराने जुवाह् करण्याचे निदर्शनास आल्यास गुत्तेदाराचा ठेका तात्काळ रदद होईल. असे असताना नस्तीसोबत दर्गाह् हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब येथील उरुसमधील बोकड जुबाह् करणा-या व्यक्तींनी (श्री आजम खान पठाण, गुलशन बाग परभणी, श्री यशवंत पांडुरंग गुरे, इब्राहीम भाई छोटू व इतर) ला मा.जिल्हाधिकारी, परभणी यांना तक्रार देऊन सदर गुत्तेदार हा बोकड कटींग रु.200 ते रु.250 या दराने करीत असल्याचे कळविले आहे. परंतु अटी शर्तीतील तरतुदीप्रमाणे मंडळाने सदर गुत्तेदार हा मंजुर दरापेक्षा जादा दराने कटींग करीत असल्याबाबतचे कुठलीही चौकशी केल्याचे दिसून आले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |

| 6 | दर्गा रोना परंडा ता.अंबड जि.जालना येथील गेस्ट हाऊस चालविण्याचा ठेकाद देणेबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 2 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

आदेशानुसार रक्कमा विलंबाने भरलेल्या आहे. नस्तीसोबत नोंद रजिस्टर दिसून आले नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा रोना परंडा ता.अंबड जि.जालना येथील गेस्ट हाऊस भाडयाने देणेबाबत निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | रु.10000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | रु.100000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | रु.1000 |
| 4 | कालावधी | दि.09.10.2010 ते 08.10.2011 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | औरंगाबाद टाइम्स दि.08.09.2010 |
| 6 | करारनामा | रु.100 चे मुद्रांकावर केलेला आहे. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि.08.9.2010 ते 18.09.2010 |
| 8 | निवीदा उघडणे | दि.11.10.2011 |
| 9 | प्राप्त निवीदा | 1.सय्यद मुजावेद - रु.160000<br>2.सय्यद जफर - रु.150000<br>3.मो आरेफ - रु.140000 |
| 10 | निवीदा मंजुरी | सय्यद मुजावेद म.माजिद - रु.160000 |
| 11 | पुरवठा आदेश | कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/171/ 11 क्र.मरावमं/एसएनटी/टेंडर/4669/2010 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.10.10.2010 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा केल्याचा तपशिल | 1. पावती क्र.30923 दि.05.10.2010 रु.10000<br>2. पावती क्र.30924 दि.05.10.2010 रु.80000<br>3. पावती क्र.24880 दि.07.12.10 रु..20000<br>4. पावती क्र.33002 दि.28.12.10 रु..20000<br>4. पावती क्र.34841 दि.10.02.11 रु..30000<br>-----------------------------------------------<br>एकूण रक्कम = रु.160000 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1. सय्यद मुजावेद यांना कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/171/11 क्र.मरावमं/एसएनटी/टेंडर/3815/2011 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.14.10.2011 अन्वये देण्यात आले असून सदरील निवीदेची एकूण रक्कम खालीलप्रमाणे तीन हस्यात मंडळाकडे भरणा करावी -

1. 50% रक्कम - करारनामा करुन देतेवेळेस (3 दिवसाच्या आत)
2. 25% - 3 नोव्हेंबर 2010 पर्यंत
3. 25% - 31 जानेवारी 2011 पर्यंत

पुरवठा आदेशाप्रमाणे तसेच निवीदेतील अट क्रमांक 13 अन्वये मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम निवीदा मंजुर करण्याच्या दिनांकापासून 3 दिवसाच्या आत मंडळाकडे भरली आहे. परंतु 25 टक्के रक्कम दिनांक 03.11.10 रोजी पर्यत भरणे आवश्यक असतांना दिनांक 28.12.10 रोजी इतकी विलंबाने भरली आहे. विलंबाबाबत खुलासा करावा.

2. निवीदा सुचनेमधील अट क्रमांक 19 प्रमाणे ठेकेदाराने पर्यटकांना देण्यात येणा-या विश्रामगृहाचे भाडे रु.200 प्रती खोली पेक्षा जास्त आकारु नये, सदर भाडे 12 तासांच्या वास्तव्यासाठी राहील. विश्रामगृहातील थांबणा-या पर्यटकांची नोंद रजिस्टरमध्ये घेणे आवश्यक राहील, त्यात पर्यटकांच्या येण्याची वेळ, दिनांक व खोली सोडून जाण्याची वेळ व दिनांक नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांना दोन दिवसांच्या पेक्षा जास्त कालावधीसाठी राहण्याची परवानगी देता येणार नाही, असे असताना नस्तीसोबत नोंद रजिस्टर दिसून आले नाही. त्यामुळे पर्यटकांकडून रु.200 प्रमाणेच भाडे आकारलेबाबत तसेच पर्यटक दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस राहिलेबाबतची खात्री करता आली नाही. तेव्हा सन 2010-2011 मधील पर्यटकाची नोंद रजिस्टर लेखापरीक्षणास सादर करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

| अर्ध ममास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATDDGM8101 |
|---|---|

| 7 | पानचक्की प्रवेश फी निविदा बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 2 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

आदेशानुसार रक्कमा विलंबाने भरलेल्या आहे. नस्तीमोबत नोंद रजिस्टर दिसून आले नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना ठेका पनचक्की औरंगाबाद परिसरात येणा-या पर्यटका कडुन प्रवेश शुल्क घेणे साठी निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | रु.50000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | रु. |
| 3 | को-या निवीदांची किंमत | रु.1000 |
| 4 | कालावधी | दि.09.11.2010 ते 08.12.2011 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | औरंगाबाद टाइम्स दि.09.09.2010 |
| 6 | करारनामा | रु.100 चे मुद्रांकावर केलेला नाही. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि.21.9.2010 ते 23.09.2010 |
| 8 | निवीदा उघडणे | दि.24.09.2010 |
| 9 | प्राप्त निवीदा | 1.हानीफ एस एम -1200986/-<br>2.नंदीर इंटरप्राईजेस - 850000/- |
| 10 | निवीदा मंजुरी | हानीफ एस एम -1200986/- |
| 11 | पुरवठा आदेश | कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/171/ 11 |

| | | |
|---|---|---|
| | | क्र.मरावमं/एसएनटी/टेंडर/4669/2010 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.10.10.2010 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा केल्याचा तपशिल | 1. पावती क्र.31883 दि.08.11.2010 रु.200000<br>2. पावती क्र.31884 दि.8.11.2010 रु.600393<br>3. पावती क्र.34663 दि.21.01.11 रु..300000<br>4. इसारा रक्कम रु.50000<br>-----------------------------------------------<br>एकूण रक्कम = रु.1150392 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1. सय्यद मुजावेद यांना कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/171/11 क्र.मरावमं/एसएनटी/टेंडर/3815/2011 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.14.10.2011 अन्वये देण्यात आले असून सदरील निवीदेची एकूण रक्कम खालीलप्रमाणे तीन हप्त्यात मंडळाकडे भरणा करावी -

1. 50% रक्कम - करारनामा करुन देतेवेळेस (3 दिवसाच्या आत)
2. 25% - 3 नोव्हेंबर 2010 पर्यंत
3. 25% - 31 जानेवारी 2011 पर्यंत

पुरवठा आदेशाप्रमाणे तसेच निवीदेतील अट क्रमांक 13 अन्वये मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम निवीदा मंजुर करण्याच्या दिनांकापासून 3 दिवसाच्या आत मंडळाकडे भरली आहे. परंतु 25 टक्के रक्कम दिनांक 03.11.10 रोजी पर्यंत भरणे आवश्यक असतांना दिनांक 28.12.10 रोजी इतकी विलंबाने भरली आहे. विलंबाबाबत खुलासा करावा.

2. उपरोक्त निविदेची तपाणी केली असता दिनांक 23.9.10 रोजी निविदा उघडल्यानुसार 2 निविदाधारकानी निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन येते. परंतु लखोदा अ मध्ये 100% कागदपत्राची पुर्तता नसल्याने फेर निविदा मागविण्याच्या सुचना मु.का.अ.यांनी दिल्याचे नस्ती टिप्पणी क्र.- दिनांक 24.9.10 रोजीच्या टिप्पणी वरुन दिसुन येते. परंतु फेर निविदेचे कोणतेही अभिलेखे लेखा परिक्षण पथकास उपलब्ध केले नसल्याने फेर निविदा का करण्यात आल्या नाही यावावतचे कोणतेही अभिलेखे व मु.का.अ. यांचा आदेश मान्य करण्यात आल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन आले नाही. व्यापक प्रसिध्दी न मिळाल्याने व फेर निविदा न मागविल्याने बोर्डाचे नुकसान झाल्याचे शक्यता नाकरता येत नाही. तसेच निविदा योग्य पध्दतीने राबविल्या नसल्याचे नस्तीवरुन दिसुन येते.

3. निविदेच्या अटी व शर्ती नुसार अट क्र.32 नुसार निविदा मंजुर झाल्यानुसार गुत्तेदारास 100/- च्या बॉड पेपरवर करारनामा करुन घ्यावा लावगेल अशी अट असतांना गुत्तेदाराने करारनामा केलेला नाही.

4. अटी व शर्ती नुसार अट क्रमांक 20 अन्वयें -

| अनु.क्र. | पर्यटक | लहान मुले 11 वर्षाखालील | 11 वर्षापेक्षा जास्त सर्वासाठी शुल्क |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय नागरीक | रुपये -3 (तीन रुपये) | रुपये -5/- (पाच रुपये) |
| 2 | विदेशी पर्यटक | रुपये -20 (वीस रुपये) | रुपये -20 (वीस रुपये) |

ठेकेदारांनी वरील काळात मंडळाने ठरवुन दिलेल्या प्रवेश शुल्कापेक्षा जास्तीचे शुल्क आकारु नये. तसेच गुत्तेदाराने आपले कर्मचारी गणवेशात ठेवावे. तसेच येणा-या पर्यटकाशी सोम्य व सभ्य वर्तन ठेवावे एखदया पर्यटकाने या बाबत तक्रार केल्यास किंवा तक्रार नोंदवही ठेवावी. अशी नोंदवही ठेवलेली नसल्याचे दिसुन येते.

5. गुत्तेदाराने टेंडर रकक्म रुपये 50593/-कमी भरणा केल्याचे उपलब्ध लेख्यावरुन दिसुन येते, गुत्तेदाराकडुन रु.50593/- वसुल करुन निधीला जमा करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासुन yyyy-yyyy)+1( | लेपवर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |
|---|---|

| 8 | वसुलीच्या रकमा विलंबाने बँकेत भरणा करणे बाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| 0 | 0 |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | | 50593 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 50593 | 0 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना वक्फ फंड विभागीय कार्यालयात पावत्याव्दारे जमा रक्कमा विलंबाने बँकेत भरणा केलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना विभागीय

कार्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता वक्फ मंडळाच्या मालमत्तेचे भाडे, विविध शुल्कांच्या वसुल केलेल्या रोख रकमा वसुली लिपीकांनी विलंबाने बँकेत भरणा केल्याचे दिसून येते. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पावती क्रमांक | पावत्या वसुली दिनांक | रक्कम | बँकेत भरणा दिनांक | विलंब (दिवसांत) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 25282 ते 25299 | 05.05.10 | 13838 | 15.05.10 | 10 |
| 2 | 25300 ते 25533 | 6.05.10 | 18115 | 15.05.10 | 09 |
| 3 | 25534 ते 25548 | 07.05.10 | 8620 | 15.05.10 | 08 |
| 4 | 25549 ते 25569 | 10.5.10 | 14100 | 15.05.10 | 05 |
| 5 | 25570 ते 25601 | 11.5.10 | 15765 | 15.05.10 | 04 |
| 6 | 25602 ते 25629 | 12.05.10 | 13579 | 18.05.10 | 04 |
| 7 | 25630 ते 25654 | 13.05.10 | 33851 | 18.05.10 | 04 |
| 8 | 25655 ते 25674 | 14.5.10 | 10460 | 24.05.10 | 10 |
| 9 | 25675 ते 25689 | 15.05.10 | 18234 | 24.05.10 | 09 |
| 10 | 25690 ते 26103 | 17.05.10 | 8490 | 24.05.10 | 07 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1.वरीलप्रमाणे वेगवेगळया प्रकारे वसुल करण्यात आलेल्या रक्कमा वसुल झाल्यानंतर 3 दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक असताना सदर रक्कम बँकेत उशीरा भरण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा सादर करावा.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेखावर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेखावर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05 | 17/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATKVJM6301 |

| 09 | दर्गा हजरत सय्यद तुराबुलहक्क साहेब परभणी येथील उर्स करीता शोलॅन्ड / झोका करीता निविदा मागविण्यामधील अनियमितता. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसुलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यद तुराबुलहक्क साहेब परभणी येथील उर्स करीता शोलॅन्ड / झोका करीता दिनांक 31.01.2011 ते 12.02.2011 या कालावधी करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | रु.1500 |
| 2 | अंदाजीत रक्कम | रु.60000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | रु.500 |
| 4 | कालावधी | दि.31.1.2011 ते 12.02.2011 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | औरंगाबाद टाइम्स दि.01.01..2011 |
| 6 | करारनामा | रु.100 चे मुद्रांकावर केलेला आहे. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दि.3.1.2011 ते 11.01.2011 |
| 8 | निवीदा उघडणे | दि.12.01.2011 |
| 9 | प्राप्त निवीदा | 17 |
| 10 | निवीदा मंजुरी | |
| 11 | पुरवठा आदेश | कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/171/ 11 क्र.मरावमं/एसएनटी/टेंडर/4669/2010 महाराष्ट्र |

| | | राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद<br>दि.18.01.2011 |
|---|---|---|

वरील प्रसिध्द निविदेनुसार खालील प्रमाणे 17 कंत्राटदरांनी निविदा भरुन सादर केल्या

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | प्लॉट क्रमांक | निविदा रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | नईमखॉन रहिमखॉन | 01 | 60000 |
| 2 | टिकाखॉन फय्याजखाफन | 02 | 60000 |
| 3 | सुफी अहेमदखॉन | 03 | 55000 |
| 4 | इब्रानखॉन | 04 | 69786 |
| 5 | मोहम्मद सय्यद | 05 | 71786 |
| 6 | इम्रान खुदाद हुसेनी | 06 | 76786 |
| 7 | सहिसखॉन | 07 | 95786 |
| 8 | सय्यद समी सय्यद साहब | 08 | 125786 |
| 9 | सय्यद मुर्तजा | 08 | 111111 |
| 10 | माहेम्मद इसा मोहम्मद युसुफ | 09 | 125786 |
| 11 | अतिक अहेमद जाकेर अहेमद | 10 | 40000 |
| 12 | हाफीज अहेमद जाकीर अहेमद | 10 | 125786 |
| 13 | मोहम्मद अजीज मोहम्मद युसुफ | 11 | 95000 |
| 14 | मोहम्मद इस्माइल मोहम्मद युसुफ | 12 | 75000 |
| 15 | अकबरखॉन | 13 | 65000 |
| 16 | शेख साकेर शेख गौस | 14 | 65000 |
| 17 | नइमोददीन लतीफोददीन | 15 | 65000 |

यावर खालील आभिप्राय आहेत. -

1. प्राप्त दरपत्रकाचे लखोटे कार्यालयीन पध्दतीने आवक क्रमांकासह दिसुन आले नाही.

2. लखोटे उघडतांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार कुणासमोर अघडले यावाबचे सक्षम प्राधिका-याची लखोटयावर स्वाक्षरी नाही.

3. प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता दिसुन आला नाही.

4. केवळ प्लॉट क्रमांक 8 व प्लॉट क्र.10 करीताच प्रत्येकी दोन दरपत्रके प्राप्त झाली व त्यातुन जास्तीच्या दरास मान्यता दिली गेली. मात्र उर्वरीत प्लॉट करीता प्रत्येकी 1 एकच दरपत्रक प्राप्त होवुन ते मंजुर करण्यात आले हि बाब शासन निर्णयातील तरतुदीशी सुसंगत नाही. या मुळे मंडळाचे तुलनात्म दर प्राप्त न झाल्याने आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच मंडळाने प्लॉटची रक्कम रु.60000/-ठरवली असतांना प्लॉट क्र.03 निर्धारीत रक्कमेपेक्षा कमी रक्कमेने भाडयाने देण्याच्या कारणाचा खुलासा करावा.

5. श्री टिकाखॉन यांनी नवीन करारनामा न करता जुना करारनामा ची प्रत जोडल्याची दिसुन येते हि बाब अयोग्य् आहे.

6. सदरील जागेवर शुलेंड /झुले स्थापीत झाल्यावर याबाव विज मंडळ तसेच सक्षम तांत्रीक अधिका-याचे सुरक्षिततेचे प्रमाणपत्र संचिकेत दिसुन आले नाही. दर्शवुन पुर्तता करावी.

7. निविदेस व्यापक प्रसिध्दी न देता केवळ औरंगाबाद टाईम्स या वृत्त पत्रात प्रसिध्दी दिली आहे. त्यामुळे मंडळास स्पर्धात्क

| |
|---|
| दराचा फायदा होउ शकला नाही. |

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 08/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATKVJM6301 |

| 10 | विवाह नोंदणी फॉम वाटप / वाटप नोंदवहीमधील अनियमितता | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

| |
|---|
| विवाह नोंदणी फॉम वाटप / वाटप नोंदवहीमधील अनियमितता |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना विवाह नोंदणी फॉम वाटप / वाटप नोंदवहीची तपासणी केली असता यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

1. विवाह नोंदणी फॉम विभागीय कार्यालयास कधी व किती संख्येत प्राप्त झाले यावाबत साठा नोंदवही उपलब्ध न झाल्याने पडताळणी करता आले नाही.
2. वक्फ नियामावली 2002 मधील तरतुदीनुसार विहीत नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही.
3. फॉम वाटप करणा-या आधिकारी कर्मचारी यांची नोंदवहीवर स्वाक्षरी नाही.
4. नोंदवहीत प्राप्त साठा ,शिल्लक साठा यांची नोंद घेतलेली नाही.

उपरोक्त नोदवही अदयावत करुन पुर्तता दर्शवावी.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 08/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATKVJM6301 |
|---|---|

| 11 | विड जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावर देण्यामधील अनियमिता. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितनांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 5 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

विड जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावर देण्यामधील अनियमिता.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना विड जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावरदेण्यात आलेल्या नोंदवहीची तपासणी करुन खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वक्फ नियामावली 2002 मधील तरतुदीनुसार भाडेनोदवही नमुना म (8) नियम 12 (1)(8) नुसार विहीत नमुण्यात ठेवलेली नाही.

2. अजुमान इस्लामीक मुजलीम यांच्या अतंर्गत सचिव अजुमान इशाद तालीम बीड यांना दिनांक 06.01.1986 रोजी वार्षिक रुपये 100/- भाडयाने जागा देण्यात आली मात्र दिनांक 01.09.2008 नंतर या जागेची भाडे वसुली झालेली नाही. जवाबदारी निश्चीत करावी.

3. मस्सीद दिवान बडा अंतगर्त मोहम्मद ताहेर यांना अनुक्रमांक 170 ची मिळत रुपये1100/- वार्षिक भाडयाने 1988 मध्ये देण्यात आली. दिनांक 31.3.1997 नंतर यांचे भाडे वसुल झालेले नाही. याबावत खुलासा करावा.

4. दर्गा हजरत सुलेमान यांचे अतंर्गत शेख सुजाउदिन , मिर्झा शफीक यांना अनुक्रमां 20 (ड) पीटीआर 92 -13-339 हि एकुण 38000 घनफुट जागा 51 वर्षासाठी रुपये 5000/- वार्षिक कराराने दिली मात्र 2001 नंतर संबधीताने भाडयाची रक्कम भरलेली नाही. सदर बाब गंभीर असुन वक्फ मंडळाची आर्थिक बाजु कमकुत करणारी आहे.

5. नोंदवहीतील नोंदी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेल्या नाहीत. याच प्रमाणे इतर मालमत्ताचे थकीत भाडे वसुल करुन पुर्तता दर्शवावी .

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेखवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेखवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 08/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATKVJM6301 |
|---|---|

| 12 | परभणी जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावर देण्यामधील अनियमिता. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 07 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

परभणी जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावर देण्यामधील अनियमिता.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना परभणी जिल्हातंर्गत वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता भाडेतत्वावरदेण्यात आलेल्या नोंदवहीची तपासणी करुन खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. वक्फ नियामावली 2002 मधील तरतुदीनुसार भाडेनोदवही नमुना म (8) नियम 12 (1)(8) नुसार विहीत नमुण्यात ठेवलेली नाही.
2. सदरील नोंवहीत भाडेकरुनचे नांव मालमत्ता क्रमांक, नियम भाडे, भाडे निश्चीत करणारे प्राधिकरण, तांबा घेतल्याचा दिनांक, अग्रीम असा तपशिल नोंदविलेला नाही.
3. किरायाने दिलेल्या वास्तु चे क्षेत्रफळ व विस्तृत तपशिल नमुद नाही.
4. सप्टेंबर 2009 मध्ये किरायाचे नुतणीकरण केल्याचे दिसुन येते मात्र त्यानंतर बदल झालेला नाही. तसेच वासुचे भाडे कशाच्या आधारे ठरविले या बाबत अभिलेखे उपलब्ध नाही.
5. वक्फ मालमत्ता भाडे पटटा, लीज रुल्स नुसार भाडे करार केल्याचे दर्शवावे.
6. उस्मानिया मशिंद अंर्तगत खोली क्रमांक 1 ऑगस्ट 2001 पासुन, खोली क्र.2 मार्च 2003 पासुन, खोली क्र.3 नोव्हेबर 2006 पासुन, खोली क्र.04 सप्टेंबर 1996 पासुन भाडयाने दिलेले नाहीत त्यामुळे मंडळाचे आर्थिक नुकसान झालेले आहे, याबाबत खुलासा करावा.
7. नोंदवहीतील नोंदी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेल्या नाहीत. याच प्रमाणे इतर मालमत्ताचे थकीत भाडे वसुल करुन पुर्तता दर्शवावी .

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेखवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेखवर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 05 | 08/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATKVJM6301 |
|---|---|

| 13 | गुंतवणुककीची/ ठेवीची नोंदवही बाबत | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

अधिनियम 1995 चे नियम 36 (1) नुसार नमुना ब ई-5 मध्ये विभागाने गुंतवणुंक नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना गुंतवणुंक नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 36 (1) नमुना ब ई-5 विभागाने या नमुण्यात गुंतवणुंक नोंदवही ठेवणे आवश्क आहे मागील वर्षात कीती मुदत ठेवी होत्या ? त्या जास्तीत जास्त कीती व्याज मिळाले ? जास्तीत जास्त व्याज मिळण्यासाठी बँकेसोबत वाटाघाटी केल्याबाबत कोणताही तपशील लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाला नाही याबाबत अर्धसमास पत्र देवुनसुध्दा सदरचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021

अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021

अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021

आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 2 | 11/02/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |
|---|---|

| 14 | जंगम मालमत्ता नोंदवही बाबत | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमितनांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(5) विभागाने या नमुण्यात जंगम मालमतता नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना जंगम मालमतता लेखापरीक्षणास उपल्व्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(5) विभागाने या नमुण्यात जंगम मालमतता नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2010-2011 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे जंगम मालमत्ता नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा जंगम मालमत्ता नोंदवही उपल्वध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील जंगम मालमत्तेची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021

अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021

अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021

आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |
|---|---|

| 15 | स्थावर मिळकतीची नोंदवही बाबत |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| 0 | 0 |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | ई फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(4) विभागाने या नमुण्यात स्थावर मीळकतीची नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना स्थावर मीळकतीची नोंदवही लेखापरीक्षणास उपल्ब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(4) विभागाने या नमुण्यात स्थावर मीळकतीची नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2010-2011 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे स्थावर मीळकतीची नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा स्थावर मीळकतीची नोंदवही उपल्ब्ध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील स्थावर मीळकतीची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021

अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021

अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021

आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |
|---|---|

| 16 | भाडे पटटा/ गहाण नोंदवही बाबत | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | व फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(7) विभागाने या नमुण्यात भाडे पटटा/ गहान नोंदवही ठेवलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2010-2011 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना भाडे पटटा/ गहान नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येत आहे.

.1 वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना म-(7) विभागाने या नमुण्यात भाडे पटटा/ गहान नोंदवही ठेवणे आवश्क आहे सन 2010-2011 या वित्तीय वर्षात खालील प्रमाणे स्थावर भाडे पटटा/ गहान नोंदवही लेखापरीक्षणास अर्धसमास पत्र देवुन सुध्दा भाडे पटटा/ गहान नोंदवही उपलब्ध झाली नाही त्यामुळे वक्फ मंडळाकडील भाडे पटटा/ गहान बाबतची पडताळणी करता आली नाही पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021
अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021
अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021
आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासुन yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |
|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATRBTM7201 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19 | वक्फ बोर्ड सन 2010-2011 मध्ये भाडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमततांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस उपब्ध न झाले बावत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | व फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना(7) (8) अन्वये विभागाने वक्फ वोर्ड सन 2010-2011 मध्ये भाडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमत्तांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस उपलब्ध न झाले वावत.

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 12 (1) नमुना(7) (8) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2010-2011 मध्ये भाडे तत्वावर/ लीजवर देण्यात आलेल्या मालमततांचे मागणी वसुली व करारनामे लेखापरीक्षणस सादर केले नाही त्यामुळे वोर्डाकडे किती मालमत्ता आहे तसेच मालमत्ता भाडेतत्वावर/लीजवर देतांना मंडळाची मुजुरी घेवुनच दिल्या किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. तसेच त्याच्याकडुन मुदांक पेपरवर करार नामा केला कींवा कसे यावाबत अर्धसमास पत्र देवुन सुधा उपल्वध झाले त्यामुळे मालमत्ता धारकाकडे किती थकवाकी आहे किती रक्कम वसुल केली याची पडताळणी करता आली नाही.
उपरोक्त वावीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.
अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021
अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021
अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021
आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्षा . पर्यंन (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DDATRBTM7201 |
|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | वक्फ बोर्ड सन 2010-2011 मध्ये स्थावर मालमत्तेचा लीलावाबाबत | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | व फंड | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 18(32) नमुना(झेड) अन्वये विभागाने वक्फ बोर्ड सन 2010-2011 स्थावर मालमत्तेचा लीलावावाबत संचीका लेखापरीक्षणस उपब्ध न झाले बाबत.

वक्फ अधिनियम 1995 चे नियम 18(32) नमुना(झेड) अन्वये विभागाने वक्फ बोर्डसन 2010-2011 स्थावर मालमत्तेचा लीलावावाबत संचीका लेखापरीक्षणस उपब्ध झाले नाही त्यामुळे सन 2010-2011 मध्ये कीती मालमत्तेचे लीलाव झाले सदर लीलाव हे वित्तीय वर्षाच्या बाजार भावाप्रमाणेच झाले कींवा कसे याची पडताळणी करता आली नाही तसेच मालमत्तेच्या लीलावाची रक्कम मालमत्ता धारकाकडुन पुर्ण वसुल झाली कींवा कसे याची पडताळणी करता आली नाही.या बाबत अर्धममास पत्र देवुन सुधा सदर संचीका उपल्बध झाली नाही.

उपरोक्त बाबीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.

अर्धमासपत्र 2 दिनांक 11/02/2021

अर्धमासपत्र 5 दिनांक 17/02/2021

अर्धमासपत्र 7 दिनांक 22/02/2021

आज्ञापत्र 22 दिनांक 12/03/2021

| अर्ध ममास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेपवर्ष . पासून yyyy-yyyy)+1( | लेपवर्ष . पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 22 | 12/03/2021 | 2010-2011 | 2010-2011 | 0 |

किरकोळ आक्षेप विवरणपत्र :-

लेखापरीक्षण कालावधीत किरकोळ आक्षेपांची पुर्तता केल्यामुळे किरकोळ स्वरुपाचे आक्षेप विवरणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.

उत्तरे :-

लेखा परीक्षण अहवालाचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 2011 चे कलम 10(1) मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण अहवाल मिळालेल्या तारखेपासुन 4 महिण्याचे आत अनुपालन अहवाल तीन प्रतीत अध्यक्षांच्या स्वाक्षरीने वक्फ बोर्ड,औरंगाबादच्या ठरावासह सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, औरंगाबाद यांना पाठवावे.

सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद.

प्रत अग्रेषित :

1. मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,अल्पसंख्याक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
2. मा.सचिव,लेखा व कोषागारे,मंत्रालय,मुंबई-३२
3. मा.सचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
4. मा.महालेखापाल( लेखापरीक्षा) नागपूर-२
5. मा.विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद.
6. मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, सहावा माळा, कोकण भवन, नवी मुंबई
7. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
8. मा.सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
9. मा.जिल्हा वक्फ अधिकारी,औरंगाबाद,जालना,नांदेड,उस्मानाबाद,लातूर, बीड,नाशिक,पुणे,मुबई,नागपूर
10. पुर्नविलोकन शाखा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
11. डि संचिका
12. जादा प्रत

सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद.